संक्षिप्त फौज. ख. क्र. २४८/२०२३
सरकार वि. योगेश पाडवी

निशाणी क्र. २३.

**सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र. २ यांचा शपथेवर जबाब सुरू**

नाव : विष्णु रामसिंग पाडवी,
वय :३५ वर्ष
व्यवसाय : शेती,
राहणार :तलावडी, ता. तळोदा, जि. नंदुरबार.

**सरतपास सरकार पक्षातर्फे सरकारी वकील श्री.डी. आर. जयकर यांच्यामार्फत सुरु–**

दि. १८.१०.२०२१ रोजी पोलिसांनी मला पंचनाम्यासाठी तलावडी गावात रामु रत्या पाडवी यांच्या शेतात बोलाविले होते. सदर पंचनामा हा अपघाताबाबतचा होता. घटनास्थळ सुमनबाई प्रभु पाडवी यांनी दाखविले. घटनास्थळाच्या पुर्वेला रामसिंग रत्या पाडवी याचे शेत, पश्चिमेला अर्जुन पाडवी यांचे कापसाचे शेत, दक्षिणेला तलावडी गावाची वस्ती आणि उत्तरेला रिकामे शेत होते. त्याठिकाणी पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा आमच्यासमक्ष केला. तो आम्हाला वाचून दाखविला. त्यानंतर आम्ही त्यावर सही केली. आता मला अभिलेखावरील सदर घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर अनुक्रमे १ वर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. घटनास्थळ पंचनाम्यास नि.क्र. २४ देण्यात आला.

**उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. एस. पी. ठाकरे यांच्यामार्फत–**

२. मला लिहिता वाचता येते. माझे शिक्षण १२ वी पर्यंत झाले आहे. मी तलावडी गावामध्ये जन्मापासून राहतो. फिर्यादी सुमनबाई हि माझ्या भावाची पत्नी आहे. हे म्हणणे खरे आहे कि, मयत दिनेश पाडवी हा फिर्यादी सुमनबाई हिचा मुलगा होता. हे म्हणणे खरे आहे कि, सुमनबाई हि तिच्या पतीपासून वेगळी राहत आहे. हे म्हणणे खरे आहे कि, मी व फिर्यादी आम्ही वेगवेगळे राहतो. हे म्हणणे खरे आहे कि, चंद्रसिंग पुनमचंद पाडवी हा तलावडी गावाचा रहिवासी आहे. हे म्हणणे खरे नाही कि, चंद्रसिंग हा तळोदा येथे रेशन धान्य दुकानामध्ये धान्य वाहतुकीचे काम करतो. हे म्हणणे खरे आहे कि, मयत दिनेश पाडवी हा चंद्रसिंग पाडवी याचा नातु लागतो. हे म्हणणे खरे आहे कि, आदिवासी चालिरितीप्रमाणे घरामध्ये एखादा व्यक्ती मयत झाल्यानंतर कुटुंब प्रमुख तीन दिवस घराबाहेर निघत नाही. हे म्हणणे खरे आहे कि, सुमनबाई हि तिच्या कुटुंबाची कुटुंब प्रमुख आहे.

३. तलावडी ते तळोदा येण्याकरीता एकच मुख्य रस्ता आहे. हे म्हणणे खरे आहे कि, सदर रस्ता हा धडगाव कडे जातो. हे म्हणणे खरे आहे कि, सदर रस्त्यावरती तलावडी, कोठार, रोझवा आणि रोझवा पुर्नवसन हि गावे आहेत. हे म्हणणे खरे आहे कि, सदर रस्ता पुर्वे पश्चिम आहे. हे म्हणणे खरे आहे कि, तळोदा ते धडगाव रस्त्यावरती गर्दी असते.

**४.** हे म्हणणे खरे आहे कि, फिर्यादी सुमनबाई हि तिचा मुलगा दिनेश याला सोडून मोलमजुरी करीता जात होती.

**<u>मध्यातरांची वेळ झाल्याने उलटतपास मध्यांतराच्या वेळेपर्यंत तहकूब.</u>**

श्रवणोत्तर स्वीकृती,
MANE DINESH DAGADU Digitally signed by MANE DINESH DAGADU Date: 2026.07.14 15:13:15 +0530
(डी. डी. माने)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, तळोदा

दिनांक : १४.०७.२०२६
ठिकाण : तळोदा

**<u>मध्यातरांची वेळ पुर्ण झाल्याने उलटतपास पुन्हा शपथेवर सुरू–</u>**

**५.** हे म्हणणे खरे आहे कि, तलावडी गावातील शेतकरी लोकांना मी ओळखतो. हे मला माहिती नाही कि, धडगावकडे जाणा–या रस्त्यालगत तलावडी गावामध्ये भरत, जगु, भिमसिंग आणि रामा यांची शेत आहे किंवा कसे. घटनास्थळ ते माझ घरं यामधील अंतर मला सांगता येणार नाही. मला पंचनामा करण्यासाठी मोरे यांनी बोलाविले होते. पंचनामा करण्याकामी दोन पोलिस हजर होते.

**६.** हे म्हणणे खरे नाही कि, घटनास्थळ हे रामु रत्या पाडवी यांचे शेत असल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही कि, मी खोटया चतुःसिमा सांगितल्या आहेत. हे म्हणणे खरे आहे कि, धडगावकडे जाणा–या रोडवरती तलावडी गाव हे पुर्वेला आहे. हे म्हणणे खरे आहे कि, धडगाव तळोदा रस्त्याच्या दक्षिण दिशेला शेती आहे. हे म्हणणे खरे नाही कि, पंचनाम्यावरती पोलिस स्टेशन येथे मी सहया केल्या. हे म्हणणे खरे नाही कि, फिर्याद देण्याकरीता फिर्यादीसोबत मी पोलिस स्टेशनला गेलो होतो. हे म्हणणे खरे नाही कि, घटनास्थळ फिर्यादीने दाखविले नव्हते. हे म्हणणे खरे नाही कि, पोलिसांनी मला पंचनामा वाचून दाखविला नव्हता. हे म्हणणे खरे नाही कि, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास नाकारला.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृती,
MANE DINESH DAGADU Digitally signed by MANE DINESH DAGADU Date: 2026.07.14 15:13:10 +0530
(डी. डी. माने)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, तळोदा.

दिनांक : १४.०७.२०२६
ठिकाण : तळोदा